# मुंबई विद्यापीठ

( नॅक पुनर्मूल्यांकनाव्दारे ३.६५ (सी.जी.पी.ए.) सह अ++ श्रेणी
विद्यापीठ अनुदान आयोगाव्दारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा )

महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in ई-मेल : dr.estab@fort.mu.ac.in दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४

**जाहिरात क्र.: मुंवि/मासंविक/०३/२०२४, दि. २७ जून, २०२४**

## थेट मुलाखत
## (Walk in Interview)

मुंबई विद्यापीठाच्या आस्थापनेवरील खालील पदे कंत्राटी तत्वावर ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात थेट मुलाखतीव्दारे (**Walk in Interview**) भरावयाची आहेत. त्याकरीता इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्ज नमुन्यानुसार आवश्यक शैक्षणिक व अनुभवाच्या कागदपत्रांसह **दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता** मुंबई विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, ३ रा मजला, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई – ९८ येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / Jr. Engineer (Civil) | ०६ पदे | ST – ०१,<br>VJ(A), NT(B), NT(D) व SBC या क्रमाने आळीपाळीने – ०१,<br>OBC-०१, SEBC-०१, खुला - ०२ |
| २ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) / Jr. Engineer (Electrical) | ०२ पदे | ST/VJ-A/OBC/SEBC/ NT-C/EWS/NT-D/SBC या क्रमाने आळीपाळीने – ०१,<br>खुला - ०१ |

**टिप** : मागील वर्षी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर SC, NT(C) व EWS तसेच कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावर NT(B) व SC या प्रवर्गातील उमेदवारांची आळीपीळीनुसार निवड करण्यात आल्याने सदर प्रवर्गाची पदे वगळण्यात आली आहेत.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२१/प्र.क्र.७७/१६ क, दि, ०६/०३/२०२४
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६ ब, दि, २५/०२/२०२२

➢ **उपरोक्त पदांना आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व मानधन पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता, अनुभव व मानधन |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**<br>( Junior Engineer - Civil ) | **अ) शैक्षणिक अर्हता व अनुभव :**<br>१) किमान ३ वर्ष कालावधीची स्थापत्य अभियांत्रीकी पदविका किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी किंवा त्यास समकक्ष म्हणून मान्यताप्राप्त पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) डिझायनिंग आणि / किंवा बांधकाम क्षेत्रातील कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**आ) मानधन :** रु. ४०,०००/- प्रतिमाह. |
| २ | **कनिष्ठ अभियंता (विद्युत)**<br>( Junior Engineer - Electrical ) | **अ) शैक्षणिक अर्हता :**<br>१) किमान ३ वर्ष कालावधीची विद्युत अभियांत्रीकी किंवा विद्युत आणि इलेक्ट्रॉनीक अभियांत्रीकी पदविका उत्तीर्ण किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रीकी पदवी किंवा त्यास समकक्ष म्हणून मान्यताप्राप्त पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) संबंधित क्षेत्रातील कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**आ) मानधन :** रु. ४०,०००/- प्रतिमाह. |

## अर्जदारांसाठी सूचना

१) उपरोक्त पदांकरीता मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी सोबत जोडलेला विहित नमुन्यातील अर्ज A-4 साईजच्या कागदावर संगणकीकृत करुन त्यासोबत विहित शैक्षणिक व अनुभवाच्या प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतींसह एक संच मुलाखतीस येतांना सोबत आणावा.

२) उमेदवारांनी अर्जात स्वत:चे पूर्ण नाव, अचुक पत्ता, मोबाईल क्रमांक व स्वत:चा वैध ई-मेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे.

३) मुलाखतीस दिलेल्या वेळेच्या किमान अर्धा तास स्वखर्चाने उपस्थित राहावे. उशीरा येणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही.

४) उपरोक्त पदे केवळ ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात व ठोक मानधनावर भरण्यात येणार असल्याने या पदावरील कर्मचाऱ्यास शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

५) उपरोक्त सर्व पदांकरीता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकरीता मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६) महाराष्ट्राचे रहिवाशी असलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

७) जाहिरातीतील नमुद पदांकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता मुलाखतीच्या दिनांकापुर्वी पूर्णत: धारण करणे आवश्यक आहे.

८) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्या संदर्भातील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

९) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (EWS) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१ मे २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

१०) भरतीप्रक्रियेबाबतचा निकाल तसेच इतर सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जातील त्याकरीता उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी.

११) मुलाखतीअंती निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांच्या मुळ शैक्षणिक व अनुभवाच्या प्रमाणपत्रांची तपासणी केल्यानंतरच नियुक्तीपत्र देण्यात येईल.

१२) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सादर केलेली माहिती/प्रमाणपत्रे चुकीची/खोटी आढळल्यास त्याची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

१३) उपरोक्त पदे केवळ ११ महिन्यांकरीता हंगामी स्वरुपातील व ठोक मानधनावर भरण्यात येणार असून सदर पदांवर कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत उमेदवारांस कोणताही दावा करता येणार नाही. तसेच अशी विनंती केल्यास ती मान्य केली जाणार नाही. (संदर्भ : शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट, २००५)

१४) उपरोक्त पदांवर नियुक्त कर्मचाऱ्यांची सेवा ११ महिन्यानंतर आपोआप संपुष्ठात येईल. सदर कर्मचाऱ्यांची मागील कामगीरीचा आढावा घेऊन पुनर्नियुक्ती करण्याचे अधिकार कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना राहतील.

१५) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याकडून आवश्यक अटी व शर्ती अंतर्भुत करुन करारनामा करुन घेण्यात येईल.

१६) उपरोक्त पदांवर हंगामी स्वरुपातील नियुक्त कर्मचाऱ्यांची, आवश्यकतेनुसार कोणतीही पूर्वसूचना/कारणे न देता सेवा समाप्त करण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनास राहतील.

१७) सदर जाहिरातीतील पदसंख्या, अटी व शर्तींमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना राहतील. यासंदर्भात त्यांचा निर्णय अंतीम राहील.

**प्रभारी कुलसचिव**
**मुंबई विद्यापीठ**

# अर्जाचा नमुना

| उमेदवाराचा अलीकडील काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

प्रति,
मा. कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.

**विषय** : ……………………………………….. या पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत.

**संदर्भ** : जाहिरात क्र.: मुंवि/मासंविक/०३/२०२४, दि. २७/०६/२०२४

१) **संपूर्ण नाव** (मराठीत) : ---------------------------------------------------------------

२) **संपूर्ण नाव** (इंग्रजीत CAPITAL) : ---------------------------------------------------------------

३) **प्रवर्ग** : ----------------------------

४) **पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता** : ---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------

५) **दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** : ---------------------------------------------------------------

६) **ई मेल आयडी** : ---------------------------------------------------------------

७) **जन्मतारीख** : ------------------------------------

८) **महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ?** होय /नाही

९) **शैक्षणिक अर्हता** :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

..२..

**१०) अनुभव :**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**११) अर्जासोबत खालील (छायांकीत) सत्यप्रती जोडल्या आहेत.**

१) -----------------------------------------------------

२) -----------------------------------------------------

३) -----------------------------------------------------

४) -----------------------------------------------------

५) -----------------------------------------------------

**मी असे प्रमाणित करतो / करते की, जाहिराती मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

**ठिकाण : --------------------**
**दिनांक : -------------------**

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**